सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग,

## -जाहिरात-

**खारभूमी विकास मंडळांतर्गत कार्यालयाकरीता (कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहायक अभियंता श्रेणी - २ (स्थापत्य) सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा करारपध्दतीने विवक्षीत कामासाठी घेण्याबाबत.**

**संदर्भ :-**

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर २०१६.

२. प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र. मुअ/जसंविकोप्र/आ-२/२७५१/२०२३ दि.१०.०८.२०२३.

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे. या कार्यालयामार्फत रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग जिल्ह्यातील प्रकल्पाच्या कामाकरिता नामनिर्देशित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा. अभि. श्रेणी - २ (स्थापत्य) संवर्गातील पदे करार पध्दतीने भरावयाची आहेत. तरी पात्र सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२ (स्थापत्य) यांचेकडून विहीत नमुन्यातील अर्ज खालील नमूद केलेल्या ठिकाणी व्यक्तीशः दिनांक २९.०८.२०२३ ते ०५.०९.२०२३ पर्यंत उपलब्ध होतील.

रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विभागीय/उप विभागीय कार्यालयात खारभूमी प्रकल्पाकरीता बांधकामाची अंदाजपत्रके तयार करणे, सर्वेक्षण, निविदा, कागदपत्रे तयार करणे व प्रकल्प, क्षेत्रिय स्थळी कामावर देखरेख करणे असे कामाचे स्वरुप असेल. खारभूमी योजनांच्या निर्मितीसाठी करारपध्दतीने एकत्रित सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता/सहायक अभियंता श्रेणी - २ (स्थापत्य) यांच्या सेवा विवक्षीत कामासाठी घेण्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | पदाचे नांव | ज्या विभागांतर्गत पदांची आवश्यकता आहे त्या विभागाचे नांव | करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता/सहा. अभि. श्रेणी - २ (स्थापत्य) | १. कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण - रायगड. | १ |
| | | २. कार्यकारी अभियंता, द. र. खारभूमी विकास विभाग, रत्नागिरी. | २ |
| | | ३. कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, सिंधुदूर्गनगरी. | २ |

**अ) पदासाठी अर्हता**

१. कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता / सहा.अभि. श्रेणी - २ (स्थापत्य) संवर्गातील पदावर कमीत कमी २ वर्षांचा अनुभव आवश्यक.

**ब) वयोमर्यादा :-**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता/सहा.अभि. श्रेणी-२ (स्थापत्य) यांची कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसावी.

क) (१) अर्ज हे खालील नमुद कार्यालयात सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत दिनांक २९.०८.२०२३ ते ०५.०९.२०२३ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत रु.१००/- इतक्या किंमतीस विक्रीसाठी उपलब्ध राहतील.

➢ कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, उंबर्डे फाटा, गजानन महाराज मंदिराजवळ, रामवाडी पेण, जि. रायगड.
कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२१४३ / २५२२०३.

➢ कार्यकारी अभियंता, द.र. खारभूमी विकास विभाग, रत्नागिरी, जि. रत्नागिरी.
कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२३५२-२२८४०५

➢ कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, सिंधुदूर्गनगरी, जि. सिंधुदूर्ग.
कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२३६२/ २२८८१८.०

करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या अटी व शर्ती अर्ज विकत घेताना पहावयास मिळतील. या अटींचे पालन करणे बंधनकारक असेल.

(२) सदर परिपूर्ण भरलेले अर्ज दि.१२.०९.२०२३ सायं. ५.३० पर्यंत हस्तेपोहोच/ टपालाने संबंधीत विभागात स्विकारले जातील. अर्जांच्या पाकीटावर सेवानिवृत्त अधिकारी/अभियंता यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत असे स्पष्ट लिहावे. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा व अपूर्ण अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

(३) अपूर्ण भरलेले व चुकीची माहिती दिलेले अर्ज स्विकारण्याचा, नाकारण्याचा व पदामध्ये फेरबदल तसेच भरतीप्रक्रीया कोणत्याही कारणास्तव स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी या नात्याने खालील सही करणारे हे आपल्याकडे राखून ठेवत आहेत.

सही/-
**(प्रशांत व. बोरसे)**
**प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता,**
**खारभूमी विकास मंडळ, ठाणे.**

डीजीआयपीआर/२०२३-२०२४/३०५५

mahabharti.in